दूरध्वनी : २५३३ १२११
२५३३ १५९०

# ठाणे महानगरपालिका , ठाणे.

महापालिका भवन , सरसेनानी जनरल अरुणकुमार वैद्य मार्ग , चंदनवाडी , पांचपाखाडी, ठाणे - ४००६०२
THE MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF THANE

**वृत्तविशेष क्र. 24** **दिनांक : 09/05/2019**

## डिबी.टी योजनेतंर्गत 12 कोटीहून अधिक रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा : महापालिकेचा खुलासा

ठाणे, 9 :- ठाणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागामार्फत सन 2018-19 या वर्षातील अंदाजपत्रकामध्ये रक्कम रु. 16,59,12,714 /- करण्यात आलेल्या तरतूदीपैकी रक्कम रु. 12,84,26,127/- ही रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे. डिबीटी (डायरेक्ट बेनिफिशियरी ट्रान्सफर)योजनेतंर्गत विद्यार्थी निहाय विहित केलेले अनुदान विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावरच जमा करण्यात आले असून याबाबत शिक्षण विभागाकडे विद्यार्थी, पालक किंवा इतरांमार्फत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही. त्याचप्रमाण ठाणे महानगरपालिकेच्या कोणत्याही विद्यार्थ्यांचे वार्षिक निकाल किंवा शाळा सोडल्याचे दाखले हे थांबविण्यात आले नसल्याचे उपायुक्त (शिक्षण) मनिष जोशी यांनी नमूद केले आहे.

ठाणे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने तसेच एकापेक्षा अधिक मुले महापालिकेच्या शाळेत शिकत असल्याने शैक्षणिक साहित्य आगाऊ खरेदी करणे शक्य नसून त्याचा पुरावठा शालेय व्यवस्थापन समितीच्या नियंत्रणाखाली करण्यात यावा असा ठराव संमत करण्यात आला आहे. त्यानुसार प्रत्येक शाळा व्यवस्थापन समितीच्या नियंत्रणाखाली शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्यात आले. तसेच शैक्षणिक साहित्य गुणवर्णनप्रमाणे नव्हते, ते साहित्य व्यवस्थापन समितीतर्फे बदलून घेण्यात आले. हे शैक्षणिक साहित्य स्पेसिफिकेशननुसार व सुस्थितीत असल्याबाबत प्रमाणपत्र मुख्याध्यापकांनी सादर केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली असल्याचे मनिष जोशी यांनी सांगितले.

सन 2018-19 या शैक्षणिक वर्षात पूर्वप्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांना डिबी.टी योजनेचा लाभ देण्यात आला असून एकूण 24,427 विद्यार्थ्यांचे बँक खाते उघडण्यात आले आहे. शैक्षणिक वर्ष 2018-19 करिता विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन वस्तूनिहाय बाजारभाव तसेच गुणवर्णन निश्चित करण्यात आले असून याबाबत मुख्याध्यापकांना परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांवर ठराविका ठेकेदाराकडून वस्तू खरेदी करणेबाबत सक्ती करु नये असे परिपत्रक काढण्यात आले. आहे. त्यामुळे ठाणे मतदार जागरण यांनी प्रसिध्दीपत्रकाच्या माध्यमातून केलेले आरोप हे बिनबुडाचे असल्याचा खुलासा उपायुक्त मनिष जोशी यांनी केला आहे.